महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७ / ०८ / २०२०

**विषय : सन २०२० करीता बदली धोरण राबविण्याबाबत.**

**संदर्भ :** १. महावितरण बदली धोरण तथा प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि. १०.०८.२०१५.
२. शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.३०/कार्या १२ दि. ०७.०७.२०२०.

कंपनी अंतर्गत प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि. १०.०८.२०१५ अन्वये बदली धोरण स्विकारण्यात आले आहे, सद्यस्थितीत कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उदभवलेली परिस्थिती आणि कंपनीची आर्थिक स्थिती विचारात घेता कंपनीने खर्चात काटकसर करण्याचे धोरण स्विकारले असून, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करून दिलेल्या मंजुरीनुसार, कंपनीअंतर्गत सन २०२० करीता बदली धोरण राबविण्याकरीता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**बदली धोरण - २०२० :**

१. कंपनीमध्ये संस्थात्मक कार्यक्षमतेमध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून बदलीव्दारे योग्य व्यक्तीची योग्य ठिकाणी पदस्थापना करणे (प्रशासकीय बदली) अथवा कामकाजाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कर्मचाऱ्यानां इच्छित स्थळी पदस्थापना मिळण्याचा पर्याय उपलब्ध करून देणे (विनंती बदली), अशा बदल्यांमुळे कंपनीचे हित जोपासले जाते.

२. बदली म्हणजे हक्क नाही. विविध पदांवर कर्मचाऱ्यांना पदस्थापीत करीत असताना, प्रशासकीय गरजा विचारात घेउन संबंधित पदाचे कामकाज व्यवस्थीतरित्या पार पडण्यासाठी मनुष्यबळाचा योग्य वापर करणे ही मूलभूत बाब आहे. तथापि, शक्य तेवढया प्रमाणात कर्मचाऱ्यांच्या गरजा विचारात घेउन आणि त्यांना बदली म्हणजे शिक्षा न वाटता ते मुक्तपणे कामाला वाहून घेतील अशाप्रकारे पदस्थापना करणे आवश्यक आहे.

३. ही बाब पण लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, खाली नमूद करण्यात आलेल्या धोरणांमध्ये कोणताही बदल केल्यास अशा प्रकरणी मुख्य कार्यालयाकडून गांभिर्याने विचारात घेउन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. बदली करीत असताना एखाद्यास अवास्तव लाभ अथवा शिक्षा देणे अथवा अन्य कोणत्याही बाबी विचारात घेणे असा कोणताही प्रयत्न करण्यात येणार नाही. कर्मचारी म्हणजे कंपनीची मौल्यवान संपत्ती असून बदली प्रकरणी अनियमिता झाल्यास कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य खच्चीकरणास वाव मिळतो. समान आणि योग्य न्याय मिळणे हा कर्मचाऱ्यांचा अधिकार आहे, यास्तव प्रत्येक सक्षम अधिकाऱ्याने बदली धोरणाची अंमलबजावणी न्यायपूर्वक करावयाची आहे.

४. यावर्षीचे बदली धोरण हे संदर्भ क्र. १ मधील प्रशासकीय परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या बदली धोरण -२०१५ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या विविध सुधारणांशी अनुरूप ठेवण्यात आले आहे. सध्याची कोवीड - १९ मुळे उदभवलेली परिस्थिती विचारात घेता कंपनी आणि कर्मचाऱ्यांच्या हितास्तव करण्यात आलेले काही बदल हे केवळ या वर्षाकरीता लागू राहतील.

**<u>बदल्यांची टक्केवारी:</u>**

५. या वर्षी करण्यात येणाऱ्या बदल्यांमध्ये प्रशासकीय व विनंती बदल्या मिळून प्रत्येक पदाच्या कार्यरत संख्येच्या १५% पेक्षा जास्त बदल्या करण्यात येणार नाहीत.

**<u>आवश्यक रिक्तपदे - संकल्पना आणि मार्गदर्शक तत्व:</u>**

६. विविध मर्यादांमुळे बहुतांश संवर्गामधील मंजूर पदे १००% भरली जात नाही परिणामी या संवर्गांमध्ये पदे रिक्त राहतात. प्रत्येक संवर्गातील एकूण रिक्तपदे विचारात घेता रिक्त ठेवण्यासाठी काही पदांची निश्चीती करणे अपरिहार्य आहे. आवश्यक रिक्तपदांची संकल्पना म्हणजे जी पदे रिक्त ठेवणे शक्य आहे त्या पदांचे निर्धारण करणे होय. ज्यांची संख्या कमी आहे अशा मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता आणि समकक्ष अशा महत्वाच्या पदांपैकी कोणती पदे रिक्त ठेवण्यात यावीत याबाबत मुख्य कार्यालयाकडून निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे दक्षता व अंमलबजावणी, विधी, जरसंपर्क आणि औद्योगिक संबंध हे छोटे संवर्ग असल्याने आणि मुख्य कार्यालय स्तरावर अशा विशिष्ट स्वरूपाच्या कामकाजाचा संबंध आहे याबाबतही मुख्य कार्यालयाकडून निर्णय घेण्यात येईल. ज्या पदांची संख्या जास्त आहे अशा अतिरिक्त कार्यकारी अभियंता समकक्ष आणि त्याखालील पदांपैकी पदनिहाय आवश्यक रिक्तपदे मुख्य कार्यालयाकडून निश्चीत करण्यात येणार नाहीत. तथापि, या संवर्गांकरीता मुख्य कार्यालयाकडून प्रत्येक प्रदेशाकरीता टक्केवारी / संख्या स्वरूपात आवश्यक रिक्तपदे जाहीर करण्यात येतील, प्रदेशाअंतर्गत अशा आवश्यक रिक्तपदांचे वितरण व्यवस्थेच्या अनुषंगाने सूक्ष्म नियोजन करणे ही जबाबदारी प्रादेशिक कार्यालयांची राहील.

७. आवश्यक रिक्तपदे पुढील निकषांवर आधारीत असतील, संचलन आवश्यकते नुसार म्हणजेच महसूल, एबीआर, मेट्रो शहर (वाशी, ठाणे, कल्याण -१, गणेशखिंड, रास्तापेठ मंडल आणि नागपूर शहर मंडल), वितरण हानी, इतर शहरी तसेच ग्रामीण क्षेत्रातील महत्वाच्या बाबीनुसार प्रत्येक प्रदेशाकरीता संचालक संचलन आणि संचालक मासं हे इतर संचालक यांच्याशी विचारविनिमय करून आवश्यक रिक्तपदांची संख्या निश्चीत तसेच जाहीर करतील. तसेच माहिती व तंत्रज्ञान, सुरक्षा व अंमलबजावणी आणि विधी संवर्गातील पदांकरीता संचालक मासं हे प्रकरणपरत्वे कार्यकारी संचालक (देवम), कार्यकारी संचालक (सुवअ), आणि मुख्य विधी सल्लागार यांच्याशी विचार विनिमय करून निर्णय घेतील. आवश्यक रिक्तपदे जाहीर केल्यानंतरच बदल्यांबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच मुख्य कार्यालय, प्रवसु, चाचणी, वीजखरेदी, भार व्यवस्थापन (कळवा) आणि सॉफ्टवेअर विकास कक्ष याकरीता सेवावधीबाबतचे विशेष निकष आणि आवश्यक रिक्तपदे निश्चीत करण्यात येतील.

८. आवश्यक रिक्तपदे म्हणजे संबंधित संवर्गातील एकूण रिक्तपदे विचारात घेउन बदल्यांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरही काही पदे रिक्त ठेवण्यात येतील अशी रिक्तपदे. यापुढे सदर संवर्गात सरळसेवा भरती अथवा पदोन्नतीव्दारे नविन कर्मचारी उपलब्ध झाल्याखेरीज सदर रिक्तपदे भरता येणार नाहीत. प्रशासकीय निकड आणि मनुष्यबळ उपलब्धता विचारात घेउन सह व्यवस्थापकीय संचालक / प्रादेशिक संचालक त्यांच्या कार्यक्षेत्रातील परिमंडल कार्यालयांसाठी आणि मुख्य अभियंता त्यांच्या कार्यक्षेत्रातील मंडल व विभागीय कार्यालयांसाठी आवश्यक रिक्तपदे जाहीर करतील. आवश्यक रिक्तपदा व्यतीरिक्त उपलब्ध असणारी रिक्तपदे स्पष्ट रिक्तपदे (Clear Vacancy) म्हणून समजण्यात येतील व ही स्पष्ट रिक्तपदे बदलीकरीता विचारात घेण्यात येतील. एखाद्या कार्यालयात एखाद्या संवर्गामध्ये प्रशासकीय आवश्यकतेपेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असतील उदा: आवश्यक रिक्तपदे म्हणून जाहीर करण्यात येणार आहे अशा पदांवर कर्मचारी कार्यरत असतील तर त्यांना अन्य ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या रिक्तपदावर त्यांची पदस्थापना करण्यात येईल. परंतू या वर्षीची कोवीड -१९ प्रसारामुळे उदभवलेली विशेष परिस्थिती विचारात घेउन, एखादा कर्मचारी यापूर्वीच आवश्यक रिक्तपदावर काम करीत असेल तर त्याची प्रशासकीय कारणास्तव बदली करणे बंधनकारक असणार नाही. सदर आवश्यक रिक्तपदावरील एखाद्या कर्मचाऱ्याची विनंतीप्रमाणे बदली झाल्यास अशा आवश्यक रिक्तपदी इतर कर्मचाऱ्याची पदस्थापना करण्यात येणार नाही. मंडल आणि विभागस्तरीय ज्येष्ठतेमधील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बिंदु नामावली च्या नियमांचा भंग होणार नाही याची विशेष दक्षता घेण्यात यावी.

**प्रशासकीय बदल्या:**

९. कोरोना परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्यांचे हित आणि संचलन आवश्यकता विचारात घेउन या वर्षी करण्यात येणाऱ्या प्रशासकीय बदल्यांचे प्रमाण हे अत्यल्प असेल.

१०. गट - १ (क) नुसार (केवळ गंभीर वैद्यकीय प्रकरणी) कर्मचाऱ्यांची विनंती बदली विचारात घेण्याकरीता त्यांनी मागणी केलेल्या ठिकाणी रिक्तपद उपलब्ध नसल्यास त्या ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्याची, ज्याने जास्तीतजास्त सेवा कालावधी (आवश्यक तथा पात्र कालावधीपेक्षा जास्त) पूर्ण केला आहे अशा कर्मचाऱ्याची त्याने/ तिने सादर केलेल्या तीन पर्यायांपैकी एका ठिकाणी प्रशासकीय बदली करण्यात येईल. तथापि रिक्तपदांनुसार अशी बाब शक्य नसल्यास सदर कर्मचाऱ्याची बदली सक्षम अधिकारी अन्य ठिकाणी करू शकतील. **याशिवाय व संचलन कार्याच्या आवश्यकतेशिवाय इतर कोणत्याही कारणास्तव यावर्षी कर्मचाऱ्याची प्रशासकीय बदली करण्यात येणार नाही.**

**विनंती बदल्या:**

११. दि. ३१.०३.२०२० पर्यंत केवळ मानव संसाधन प्रणालीमधून प्राप्त झालेले अर्ज विनंती बदलीकरीता विचारात घेण्यात येतील. तथापि, दि. ३१.०७.२०२० पर्यंत गट- १ अंतर्गत गंभीर वैद्यकीय प्रकरणी प्राप्त झालेले विनंती बदली अर्ज विचारात घेण्यात यावे.

१२. प्रशासकीय बदल्या या कमीतकमी असणार आहेत याकरीता केवळ सन २०२० करीता सध्याच्या पदावरील/ ठिकाणाचा कमीतकमी सेवावधी हा ०२/०३ वर्षांवरून कमी करून ०१ वर्ष करण्यात आलेला आहे जेणेकरून जास्तीतजास्त विनंती बदली प्रकरणे निकाली काढता येतील.

१३. बदली कार्यवाही करीत असताना संबंधित अधिकारी यांनी एखादे ठिकाण / कार्यालय येथे निश्चीत केलेल्या आवश्यक रिक्तपदांच्या अनुषंगाने कमीतकमी कर्मचारी संख्येपेक्षा जास्त कर्मचारी पदस्थापीत होणार नाहीत याची खात्री करावी.

१४. कंपनीची बिकट अर्थिक स्थिती विचारात घेता, ३ वर्षे पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांच्या विनंती बदली प्रकरणी देय असणारे भत्ते, बदली अनुदान यावर्षी अदा करण्यात येणार नाही. तथापि, प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सदरचे लाभ देय असतील.

१५. सध्याच्या आणि बदलीवरील ठिकाणची आवश्यक रिक्तपदे विचारात घेउन ज्या ठिकाणी स्पष्ट रिक्तपद उपलब्ध आहे अशा ठिकाणी / कार्यालयात विनंती बदली करण्यात येईल. विनंती बदली करीता प्राधान्यक्रम ठरविण्याच्या अनुषंगाने विनंती कारणे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येत आहेत. सदरच्या प्राधान्यक्रमाची सर्व क्षेत्रीय कार्यालयांकडून देखील अंमलबजावणी करण्यात यावी:-

**गट - १**

(क) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. एसआरव्ही/प्र.क्र.५०९/कार्या -१२ दि. १५.०५.२०१९ मध्ये अंतर्भूत असलेले आजार उदा: कर्करोग, मेंदूतील गाठ किंवा मेंदुवरील शस्त्रक्रिया, मूत्रपिंड प्रत्यारोपण आणि डायलिसीस, पक्षाघात, हृदय शस्त्रक्रिया, मनोविकार आणि निश्चेतनावस्था (Coma) - हे सर्व आजार वरील नमूद केल्याप्रमाणे गांभिर्य क्रमवारीने राहतील.
**या आजारांमध्ये खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम असेल:-**

(एक) नविन रूग्णांकरीता प्रथम प्राधान्य असेल, याकरीता निदान करण्यात आल्याची तारीख ग्राहय मानावी.

(दोन) जुन्या रूग्णांना व्दितीय प्राधान्य असेल.

(तीन) प्रत्येक प्रकरणी प्रथम प्राधान्य हे कर्मचारी रूग्ण असल्यास असेल. तदनंतर कर्मचाऱ्याचे कुटुंबीयांपैकी रूग्ण असल्यास प्राधान्य देण्यात येईल. कुटुंबाची व्याख्या ही अनुकंपा नोकरी प्रकरणी असलेल्या व्याख्येप्रमाणे असेल.

(ख) **दिव्यांग कर्मचारी** : अपंगात्वाचे प्रमाणे ४०% किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास विनंती बदलीकरीता सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात यावा.

**गट - २**

(क) सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्यांचे पाल्य इयत्ता १२ वी मध्ये शिकत आहे अशा कर्मचाऱ्यांचा या गटामध्ये समावेश असेल.

(ख) जे कर्मचारी दोन वर्षांपेक्षा कमी कालावधीमध्ये सेवानिवृत्त होत आहेत अशा कर्मचाऱ्यांनी त्यांच्या सध्याच्या कामाच्या ठिकाणी कमीतकमी एक वर्ष सेवा कालावधी पूर्ण केला असणे आवश्यक आहे.

**गट - ३**

(क) या गटामध्ये गडचिरोली, नंदुरबार, मेळघाट (अमरावती), विक्रमगड आणि जव्हार आणि मोखाडा (पालघर), रत्नागिरी, सिंधुदूर्ग या दुर्गम भागांचा आणि भरारी पथके यांचा समावेश असेल.

(ख) कमाल सेवावधीनुसार प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल. सेवाकालावधीमध्ये प्राधान्य ठरविताना महिला कर्मचाऱ्यांना पुरूष कर्मचाऱ्यांच्या सेवाकालावधीपेक्षा एक वर्षाची सवलत देण्यात येईल, परंतू अशा प्रकरणी महिला कर्मचाऱ्याने सध्याच्या ठिकाणी एक वर्षाचा कालावधी पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे.

**गट - ४**

वरील तीनही गटांमध्ये ज्यांचा समावेश होत नाही अशी विनंती बदली प्रकरणे या गटामध्ये समाविष्ट असतील. या गटामध्ये संवर्गातील सेवावधीनुसार ज्येष्ठता काटेकोरपणे विचारात घेउन प्राधान्य देण्यात येईल.

१६. **एखाद्या प्रवर्गात ज्या क्षणी १५% ची मर्यादा पूर्ण होईल तदनंतर त्या प्रवर्गातील पुढील प्रशासकीय व विनंती बदल्या केल्या जाउ नयेत.**

१७. विशेष गट -३ मध्ये नमूद केलेल्या दुर्गम क्षेत्रामधील ठिकाणी एखाद्या कर्मचाऱ्यांने विनंती बदली मागीतली असल्यास, संबंधित कर्मचाऱ्याने सध्याच्या ठिकाणी एक वर्ष कालावधी पूर्ण केला असल्यास अशा प्रकरणी, कर्मचाऱ्याने विनंती बदली मागितलेल्या ठिकाणची रिक्तपद उपलब्धता आणि आवश्यक रिक्तपदे विचारात घेउन निर्णय घेण्यात यावा.

**सेवाकालावधीची गणना :**

१८. दि. १५.०७.२०२० अखेर सेवाकालावधीचे गणन करण्यात येईल. विनंती बदली करीता असणारा सेवा कालावधीबाबतचा विद्यमान निकष या वर्षाकरीता २ / ३ वर्षांऐवजी १ वर्ष असेल.

**बदलीविषयक कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक :**

१९. माहे ऑगस्ट २०२० च्या पहिल्या आठवडयामध्ये नविन शैक्षणिक वर्ग सुरू होणे अपेक्षित असल्याने बदल्या तातडीने करणे आवश्यक आहे. बदल्यांची अंमलबजावणी करण्याकरीता दि. १७ ऑगस्ट २०२० हा अंतिम दिनांक असेल.

**बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करणे :**

२०. याबाबत विद्यमान नियमांनुसार कार्यवाही करण्यात येईल. तथापि, कोरोनामुळे काही समस्या उदभवल्यास संबंधित नियंत्रण अधिकारी बदलीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी असणाऱ्या नियंत्रण अधिकारी यांच्याशी विचारविनिमय करून त्यानंतर सदर कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करतील.

**बदल्यांची क्रमवारी :**

२१. बदल्या करीत असताना १५% मर्यादेचे उल्लंघन होउ नये याकरीता क्रमनिहाय प्रथम मुख्य कार्यालय नंतर प्रादेशिक कार्यालये आणि इतर कनिष्ठ कार्यालये याप्रमाणे बदल्या करण्यात येतील. वरीष्ठ कार्यालयाकडून करण्यात आलेल्या बदल्यांची गणना १५% मध्ये करण्यात येईल आणि संबंधित पदाकरीता पदसंख्या शिल्लक असल्यास सदरच्या बदल्या कनिष्ठ कार्यालयांकडून करण्यात येतील.

**बदल्यांकरीता सक्षम अधिकारी :**

२२. क) मुख्य कार्यालय

१. कार्यकारी अभियंता आणि वरील अधिकारी तसेच औद्योगिक संबंध, जनसंपर्क, विधी आणि सुरक्षा व अंमलबजावणी यांच्या सविस्तर पदस्थापनेसह बदल्या.

२. कार्य. अभियंता पेक्षा खालील कर्मचारी यांच्या केवळ आंतरप्रादेशिक बदल्या. मुख्य कार्यालय बदली करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ परिमंडलाकडे वर्ग करेल.

ख) प्रादेशिक कार्यालय

१. अतिरिक्त कार्य. अभियंता समकक्ष आणि त्याखालील कर्मचारी यांच्या या धोरणानुसार प्रदेशांतर्गत आंतरपरिमंडलीय बदल्या (केवळ परिमंडलाकडे वर्ग करणे)

ग) परिमंडल कार्यालय

१. मुख्य अभियंता हे मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयाकडून वर्ग करण्यात आलेले अतिरिक्त कार्य. अभियंता समकक्ष आणि त्याखालील कर्मचारी यांच्या या धोरणानुसार परिमंडलांतर्गत शक्यतो विनंती अनुस्वरूप बदली/ सविस्तर पदस्थापना/ कनिष्ठ कार्यालयाकडे वर्ग करतील.

२. या धोरणानुसार परिमंडलातर्गत वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांना मंडलाकडे वर्ग करणे तसेच वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांना विभागाकडे वर्ग करणे.

३. या धोरणानुसार वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांच्या आंतर मंडलीय/ विभागीय बदल्या.

घ) मंडल कार्यालय

१. मंडलांतर्गत वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांना सविस्तर पदस्थापना देणे

२. या धोरणानुसार वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांच्या मंडलांतर्गत बदल्या.

३. या धारेणानुसार वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांच्या आंतर विभागीय बदल्या.

च) विभागीय कार्यालय

१. परिमंडल / मंडल कार्यालयाकडून वर्ग करण्यात आलेल्या वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांना सविस्तर पदस्थापना देणे.

२. या धोरणानुसार वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांच्या विभागांतर्गत शक्यतो विनंती अनुस्वरूप बदल्या करतील.

**बदल्या व सरळसेवा भरती :**

२३. यावर्षी होणाऱ्या सरळसेवा भरती नुसार उमेदवारांना नियुक्ती देण्यापूर्वी सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या करण्यात येतील.

**शीळ, मुंब्रा आणि कळवा आणि मालेगांव डीएफ:**

२४. सदर क्षेत्र फ्रँचायजीला हस्तांतरीत केल्यानंतर अतिरिक्त ठरणारे कर्मचारी यांना जास्तीतजास्त प्रमाणात जवळपास समायोजीत करण्याच्या दृष्टीकोनातून व रिक्तपदांची उपलब्धता विचारात घेउन संबंधित मंडल, परिमंडल अथवा प्रदेशामध्ये त्यांच्या विनंतीनुसार समायोजीत करण्याचा प्रयत्न करण्यात यावा, याबाबत यापूर्वीच संबंधित सक्षम अधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

**नागपूर शहर मंडल:**

२५. सदर क्षेत्र फ्रँचायजीकडून परत घेतल्यानंतर यापूर्वी एसएनडीएल ला सदर क्षेत्र हस्तांतरीत करतेवेळी ज्या कर्मचाऱ्यांची बाहेर बदली करण्यात आली होती प्रथम अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या विनंती आणि रिक्तपद उपलब्धतेनुसार सक्षम अधिकारी यांनी बदलीवर परत घ्यावे. पुनर्रचनेच्या मानकांनुसार जी पदे बाहयस्त्रोताव्दारे भरता येत नाहीत अशी सर्व पदे नियमित कर्मचाऱ्यांमधून प्राधान्याने भरण्यात यावीत.

**पदोन्नतीवरील पदस्थापना:**

२६. कर्मचाऱ्यांनी केलेल्या विनंती बदली अर्जांचा जास्तीतजास्त निपटारा करण्याकरीता, पदोन्नतीवर कर्मचाऱ्यांना विविध ठिकाणी / कार्यालयात पदस्थापना देण्यापूर्वी शक्यतो सर्व विनंती बदली अर्जांचा विचार करण्यात यावा.

२७. पदोन्नती पूर्वी कर्मचाऱ्यांनी केलेल्या विनंतीचा विचार पदोन्नतीवरील पदस्थापनेवेळी करण्यात येईल, याप्रकरणी प्रणालीमधून नविन विनंती अर्ज करण्याची आवश्यकता भासणार नाही.

**संकीर्ण:**

२८. सर्व बदली आदेश हे केवळ मानव संसाधन व्यवस्थापन प्रणालीमधूनच निर्गमित करण्यात यावेत.

२९. वेतनगट ३ व ४ मधील महिला कर्मचाऱ्यांची बदली प्रकरणे शक्यतो सहानुभूतीपूर्वक विचारात घ्यावीत.

३०. मनुष्य दिवसांचा अपव्यय टाळण्यासाठी कर्मचाऱ्यांना ७ दिवसांच्या आत सविस्तर पदस्थापनेचे आदेश देण्यात यावेत.

३१. या धोरणामध्ये समाविष्ट नाहीत अशा इतर बाबींकरीता प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि. १०.०८.२०१५ मधील मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

**व्यवस्थापनाचे हक्क:**

३२. वर नमुद केल्या प्रकरणी तसेच इतर बाबतीत कामाच्या निकडीस्तव तरतुदींमध्ये बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापनास असतील

३३. सर्व सक्षम अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सन २०२० मध्ये अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करीत असतांना बदली विषयक लागू करण्यात आलेल्या उपरोक्त सुधारीत धोरणातील तरतुदींचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

३४. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/बदली धोरण/ **१३७४२** दिनांक : **२७ /०८ / २०२०**

प्रति,

**१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.**
**२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.**
**३) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व).**

**विषय : सन २०२० करीता बदली धोरण राबविण्याबाबत - विस्तारीत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२०.

प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२० अन्वये सन २०२० करीता बदली धोरण राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

२. सन २०२० करीता निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार आवश्यक रिक्तपदे (Compulsory Vacancy (CV)) बाबत क्षेत्रीय कार्यालये तसेच कर्मचारी संघटनांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या स्तरावर अधिकारी व विविध संघटना प्रतिनिधींसोबत व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारा दि. २२ व २३ ऑगस्ट २०२० रोजी बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संघटना प्रतिनिधींकडून मांडण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे.

**क)** **संस्थात्मक आवश्यकता (Organizational Need) .** ग्राहक केंद्रबिंदू मानून त्यास सर्वोपरी सक्षम आणि परिणामकारक सेवा प्रदान करण्याच्या हेतूने कंपनीच्या मनुष्यबळाचे पुनर्वाटप करण्याची आवश्यकता आहे. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा सर्व कार्यालयांमध्ये रिक्तपदांची प्रमाणबध्द विभागणी करण्यात येईल. सर्व संवर्गांमध्ये असणारी रिक्तपदांची परिस्थिती विचारात घेता खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करण्यासाठी आवश्यक रिक्तपदांची (Compulsory Vacancy-CV) (यापूढे आवश्यक रिक्तपदांऐवजी अनिवार्य रिक्तपदे असे संबोधन्यात येईल) संकल्पना विषद करण्यात येत आहे:

i) कंपनीच्या संचलन आणि आर्थिक गरजा विचारात घेता कंपनीअंतर्गत सध्याच्या रिक्तपदांचे योग्यरित्या वाटप करणे.

ii) राज्याअंतर्गत महावितरणच्या ग्राहकांना विशेषत: ग्रामीण आणि दुर्गम क्षेत्रांमध्ये सेवेच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा करणे.

**ख)** **बदल्यांची टक्केवारी.**

i) सन २०२० करीता बदल्यांची टक्केवारी (विनंती + प्रशासकीय) ही जास्तीतजास्त १५% (काही ठिकाणी त्यापेक्षा कमीही असू शकते) निश्चीत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सूचना आणि कंपनीची संचलन आवश्यकता व आर्थिक परिस्थिती विचारात घेउन पुढील वर्षी यामध्ये बदल केला जाउ शकतो.

ii) प्रत्येक पदाच्या भरलेल्या पदसंख्येवर पूर्ण कंपनीअंतर्गत एकत्रितपणे १५% ची गणना करण्यात येईल, उदा: अधीक्षक अभियंता(वितरण) यांच्या ९५ मंजूर पदांपैकी ८६ पदे भरलेली आहेत तर ८६ पदसंख्येच्या १५% एवढया म्हणजेच एकूण १३ संख्येपर्यंत अधीक्षक अभियंता यांच्या बदल्या करता येतील.

iii) मुख्य कार्यालयाकडून प्रदेश / परिमंडलाकडे आणि सदर कार्यालयांकडून त्यांच्या अखत्यारीतील खालील कनिष्ठ कार्यालयाकडे संबंधितास अंतिम सविस्तर पदस्थापना देईपर्यंत केलेली बदली ही एकच बदली गणण्यात येईल.

iv) बदल्या करीत असतांना १५% बदल्यांच्या मर्यादेपेक्षा जास्त बदल्या होउ नयेत याकरीता क्षेत्रिय कार्यालयांनी, वरीष्ठ कार्यालयाकडून वर्ग करण्यात आलेल्या पदनिहाय बदल्यांची संख्या त्यांच्या कार्यालयाच्या बदलीच्या पदनिहाय १५% मर्यादेतून वजा करून उर्वरीत बदल्या कराव्यात.

ग) <u>अनिवार्य रिक्तपदे (Compulsory Vacancies (CVs)).</u> मंजूर पदांपेक्षा भरलेल्या पदांची संख्या कमी असल्याकारणांमुळे सध्या बहुतांश कार्यालयांमध्ये पदे रिक्त आहेत. काही प्रदेश/ परिमंडल/ अन्य क्षेत्रीय कार्यालयांमध्ये रिक्तपदांची संख्या जास्त आहे तर काही काही प्रदेश/ परिमंडल/ अन्य क्षेत्रीय कार्यालयांमध्ये रिक्तपदांची संख्या कमी आहे. सदर रिक्तपदांचा समतोल राखण्याची खरोखरच आवश्यकता असून, कोणतीही पदे सहजगत्या रिक्त राहू नयेत याकरीता विविध स्तरावरील सक्षम अधिकारी यांनी आता जी पदे रिक्त ठेवता येतील अशी विशिष्ट पदे निश्चीत करणे आवश्यक आहे. संचलनास कोणतीही बाधा येणार नाही याची खबरदारी घेउन कोणती पदे भरता येतील आणि कोणती पदे रिक्त ठेवता येतील हे ठरविण्यात येईल. सद्यस्थितीत असलेली रिक्तपदे प्रशासकीय निकडीनुसार कोणत्या ठिकाणी रिक्त ठेवण्यात यावीत याबाबत निश्चितीकरण करणे म्हणजेच अनिवार्य रिक्तपदे (Compulsory Vacancies (CVs)) ठरविणे. अनिवार्य रिक्तपदांच्या अनुषंगाने (CVs) संबंधितांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत खालील स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

i) संपूर्ण कंपनी अंतर्गत एखाद्या पदातील अनिवार्य रिक्तपदांची (CVs) संख्या आणि त्याचवेळेस त्या पदामध्ये असणारी एकूण रिक्तपद संख्या समान असेल.

ii) सदरची संख्या परिवर्तनशिल (Dynamic) असेल, सेवानिवृत्ती आणि सरळसेवा भरती / पदोन्नती होताच त्यामध्ये वाढ अथवा घट होईल.

iii) सरळसेवा भरती आणि पदोन्नतीव्दारे शक्य तेवढया प्रमाणात एकूण रिक्तपद संख्या कमी करण्याबाबत कंपनी प्रयत्नशिल असेल. एखाद्या पदाची रिक्तपदांची संख्या सरळसेवा भरती / पदोन्नतीव्दारे कमी करण्यात येईल त्यानुसार अनिवार्य रिक्तपदांची संख्या देखील त्याप्रमाणात सुधारीत करण्यात येईल. अशा बाबतीत स्पष्ट रिक्तपदे (Clear Vacancy) उपलब्ध होउन सदर पदे भरता येतील.

iv) एखादे पद अनिवार्य रिक्तपद (CV) म्हणून घोषीत केल्यानंतर, परिच्छेद क्र. २ (ग) (iii) मध्ये नमूद केल्यानुसार सदरचे पद स्पष्ट रिक्तपद (Clear Vacancy) म्हणून उपलब्ध होईपर्यंत त्याठिकाणी प्रशासकीय अथवा विनंती बदलीव्दारे कोणत्याही कर्मचाऱ्याची पदस्थापना करण्यात येणार नाही.

v) एखादा कर्मचारी सद्यस्थितीत अनिवार्य रिक्तपदावर (CV) काम करीत असेल तर त्याची सध्याच्या बदल्यांतर्गत प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात येणार नाही. तथापि, सध्याच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झाल्यानंतर अनिवार्य रिक्तपदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने त्या पदावर आवश्यक सेवावधी पूर्ण केल्यानंतर त्याची बदली करण्यात येईल. अशी बदली करीत असतांना कर्मचाऱ्याच्या विनंतीनुसार उपलब्ध स्पष्ट रिक्तपदी बदली करण्याचा प्रयत्न राहील.

vi) अनिवार्य रिक्तपदावर (CV) काम करणाऱ्या कर्मचाऱ्याची विनंती बदली झाल्यास, परिच्छेद क्र. २ (ग) (iii) मध्ये नमूद केल्यानुसार सदरचे पद स्पष्ट रिक्तपद (Clear Vacancy) म्हणून उपलब्ध होईपर्यंत त्या ठिकाणी अन्य कर्मचाऱ्याची बदली करण्यात येणार नाही.

vii) कर्मचारी अनिवार्य रिक्तपदाच्या (CV) ठिकाणी विनंती बदली मागू शकतात. तथापि, आगामी काळात सदर पदामध्ये बदल होउन त्याठिकाणी परिच्छेद क्र. २ (ग) (iii) मध्ये नमूद केल्यानुसार ते पद स्पष्ट रिक्तपद (Clear Vacancy) उपलब्ध झाल्यानंतर सदर बदलीचा विचार करण्यात येईल.

viii) सरळसेवा भरती अथवा पदोन्नतीव्दारे अनिवार्य रिक्तपद भरण्यात येणार असल्यास अशी कार्यवाही करण्यापूर्वी प्रथम सदर पदावर विनंती बदली मागितलेल्या कर्मचाऱ्याचा विचार करण्यात येईल आणि पदोन्नती/ सरळसेवा भरती करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यास उपलब्ध होणाऱ्या स्पष्ट रिक्तपदी शक्यतो त्याच्या पसंतीनुसार पदास्थापना देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. निवड यादीतील ज्येष्ठता क्रमानुसार अशा पसंतीबाबतच्या विनंतीचा विचार करण्यात येईल.

ix) सर्व स्तरावर अनिवार्य रिक्तपदे (CV) निश्चीत केल्याशिवाय कोणतीही बदली करण्यात येणार नाही.

x) बदल्यांची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर, एकदा निश्चीत आणि जाहीर करण्यात आलेल्या अनिवार्य रिक्तपदांमध्ये (CV) कोणताही बदल होणार नाही याची दक्षता घ्यावी.

xi) सांघिक कार्यालयाकडून परिमंडलनिहाय बदली करतेवेळी बदली करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्याचा प्रणालीव्दारे सादर केलेला बदलीचा पसंती पर्याय बदली आदेशात नमूद करण्यात येईल. कनिष्ठ कार्यालयांनी संबंधित कर्मचाऱ्यास वर्ग / पदस्थापना करताना उपलब्ध अनुशेष व रिक्तपदांच्या अनुषंगाने शक्यतो सदर पर्यायाचा विचार करावा.

xii) व्यवस्थापक (विवले) पद महसूल आणि लेखापरीक्षणाच्या दृष्टीकोणातून महत्वाचे असल्याने राज्यांतर्गत त्यांच्या अनिवार्य रिक्तपदांचे (CV) निश्चितीकरण हे मध्यवर्ती स्तरावर सांघिक कार्यालयाकडून करण्यात येईल.

**<u>वेतनगट ३ आणि ४ - मंडल आणि विभागस्तरीय संवर्ग (सेवाज्येष्ठता) पदे</u>**

xiii) यंदाच्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात विचारात घेउन बदल्यांबाबत यापुढे विलंब होउ नये या दृष्टीकोनातून, वेतनगट ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांच्या आंतर प्रादेशिक व आंतर परिमंडलीय विनंती बदल्या या सांघिक कार्यालयाकडून करण्यात येतील. संबंधित परिमंडलाकडील रिक्तपदे आणि अनुशेष यांची उपलब्धता विचारात घेउन संबंधित कर्मचाऱ्यांना परिमंडलाकडे वर्ग करण्यात येईल.

xiv) वरीलप्रमाणे कार्यवाही केल्यानंतर परिमंडलांतर्गत बदली करीता प्राप्त झालेल्या विनंती बदली अर्जांचा व वरीष्ठ कार्यालयांकडून वर्ग करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करून तसेच २०२० च्या मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून, संबंधित परिमंडल कार्यालये, मंडल/ विभागाकडील रिक्तपदांची उपलब्धता विचारात घेउन, पदांचा समतोल राखून त्यांचे योग्य वाटप होईल अशा रितीने संबंधित मंडल / विभागांकडे सदर कर्मचाऱ्यांच्या बदल्या/ पदस्थापना करतील.

xv) अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता त्यांच्या मंडल / विभागांतर्गत वरीलप्रमाणे बदल्यांवर आलेले/ बाहेर गेलेले कर्मचारी यांची संख्या विचारात घेउन संबंधित मंडल / विभागाकरीता अनिवार्य रिक्तपदे (CV) जाहीर करतील आणि मंडलांतर्गत आणि विभागांतर्गत बदल्यांची कार्यवाही पूर्ण करतील.

xvi) अनिवार्य रिक्तपदांमुळे कोणत्याही परिस्थतीमध्ये बिंदुनामावलीस बाधा पोहोचणार नाही. बदल्या विचारात घेत असतांना आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी वेळी बिंदुनामावलीच्या नियमांचा भंग होणार नाही याची सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी खात्री करावी.

घ) **<u>कालावधीची गणना</u>** यापूर्वीच काही बदल्या करण्यात आल्याने सेवा कालावधीची गणना ही दि. १५ जुलै २०२० पर्यंत करणे या तरतुदीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

च) **<u>बदल्यांच्या कार्यवाही करीता अंतिम तारीख</u>** बदल्यांच्या कार्यवाहीबाबत मुदतीमध्ये सुधारणा करून **<u>अंतिम तारीख दि. ०५ सप्टेंबर २०२०</u>** करण्यात आलेली आहे.

F:\Transfer 2020\Letter Transfer Guidelines 27082020.doc

छ) **बदली रद्द करणे/ सुधारीत करणे** एकदा करण्यात आलेली बदली रद्द करता येणार नाही. अपरिहार्य प्रकरणी कर्मचाऱ्याने त्याचे स्पष्टीकरण सक्षम अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्यास, लगतवरच्या सक्षम अधिकाऱ्यांची लेखी संमत्ती घेउन अशा बदलीमध्ये सुधारणा करता येईल.

३. **व्यवस्थापनाचे हक्क**

क) वरील सूचना या केवळ विस्तारीत स्वरूपात स्पष्टीकरणात्मक मार्गदर्शक सूचना आहेत, प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२० मधील तरतुदींमध्ये बदल करण्यात आला आहे असा त्यांचा अर्थ होत नाही.

ख) वर नमुद केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रशासकीय निकडीनुसार बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापनास असतील.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सस्नेह सादर :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/बदली धोरण/15201

दिनांक : १७ /०९ / २०२०

प्रति,

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
३) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व).

**विषय : सन २०२० करीता बदली धोरणतील अनिवार्य रिक्तपदांबाबत स्पष्टीकरण.**

**संदर्भ :** १) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२०.
२)मासंवि/रवका/न.क्र.५/बदली धोरण/ १३७४२ दिनांक : २७ /०८ / २०२०

प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२० अन्वये सन २०२० करीता बदली धोरण राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. २ मधील पत्रान्वये संघटना प्रतिनिधींकडून उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने विस्तारीत मार्गदर्शक सूचना देखील निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. अनिवार्य रिक्तपद संकल्पनेबाबत क्षेत्रिय कार्यालयांमध्ये अद्याप संभ्रम असल्याने, सदरच्या पदांबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

क) सद्यस्थितीत कंपनी अंतर्गत पदनिहाय असणारी एकूण रिक्तपदे विचारात घेउन सदर रिक्तपदांचे न्याय्य / समन्यायी वाटप व्हावे या हेतून अनिवार्य रिक्तपदांची संकल्पना विषद करण्यात आलेली आहे. अनिवार्य म्हणून घोषीत करण्यात आलेली पदे कोणत्याही परिस्थितीमध्ये कपात करण्यात येणार नाहीत.

ख) सदरची संख्या परिवर्तनशिल (Dynamic) असेल, सेवानिवृत्ती आणि सरळसेवा भरती / पदोन्नती होताच त्यामध्ये वाढ अथवा घट होईल.

ग) अनिवार्य रिक्तपदांमुळे अनुकंपा तत्वावरील भरती, सरळसेवा भरती, पदोन्नती बाबतच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा येणार नाही. अनिवार्य रिक्तपदांची संख्या अनुकंपा / सरळसेवा भरती / पदोन्नतीव्दारे कमी करण्यात येईल.

३. तरी वरील बाबी विचारात घेउन क्षेत्रिय कार्यालयांनी सन २०२० मधील बदल्यांबाबतची कार्यवाही पूर्ण करावी.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**प्रत सविनय सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सस्नेह सादर :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

**<u>प्रत रवाना :</u>**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
३) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.